**महाराष्ट्र शासन**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंह मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०२१०००५ Email ID adg.trg.office@mahapolice.gov.in

क्र.अपोमसं/प्रशि/पोशि भरती/विधी निदेशक /१३४/२०२३ /१७५७ मुंबई, दिनांक :- ०६/०६/२०२४

संदर्भ :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक अेपीओ-३१०६ / प्र.क्र. २२७ / पोल-३, दि.२१.०८.२००६
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एसपीपी-२००५/ प्र.क्र. २४७ / पोल-१०, दि.१५.०९.२००६
३) शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एसपीपी-२००९/९२२/प्र.क्र. १०९/पोल-१०, दि.१८.०६.२००९
४) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक अेपीओ-३११० / प्र.क्र. ४२८ / पोल-३, दि. १५.०६.२०११ व
५) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक डीपीपी-२०१८ / प्र.क्र. २२७ / पोल-१०, दि. २१.०८.२०१८.

**विषय :- पोलीस प्रशिक्षण केंद्रामधील विधी निदेशकांच्या कंत्राटी पध्दतीने नेमणूका करणेबाबत.**

---------------

शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एपीओ-३०१६ / प्र.क्र. २२७ / पोल-३, दिनांक २१.०८.२००६ व शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक अेपीओ-३११० / प्र.क्र. ४२८ / पोल-३, दि. १५.०६.२०११ अन्वये अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये निर्माण करण्यात आलेल्या विधी निदेशकांच्या पदावर खालील उमेदवारांच्या ते कर्तव्यावर हजर होतील त्या दिनांकपासून ११ महिन्यांसाठी करार पध्दतीने नेमणुका करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्रीमती पुर्णिमा भगवान महाजन | पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे |
| २. | श्रीमती सुषमा सदाशिव शिंदे | पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची - सांगली |
| ३. | श्रीमती निलीमा भास्कर वडजे | पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला |
| ४. | श्री. वसिम रहिम शेख | पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला |
| ५. | श्री. किशोर श्रीराम सरदार | पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना |
| ६. | श्रीमती स्नेहा राजतिलक चनोत्रा | पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ |
| ७. | श्रीमती अंबिका कैलास मुटकरी | पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापुर |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| ८. | श्री. अश्विन अर्जुन दिवेकर | पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना |
| ९. | श्रीमती ज्योती विठ्ठलराव जाधव | पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपुर |

**अटी व शर्ती :-**

१) सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणूका या करार पध्दतीने ११ महिन्यांसाठी गैरन्यायिक मुद्रांकावर रु.१००/- च्या स्टॅम्पवर शासनाच्या वतीने करण्यात येतील.

३) वर नमूद विधी निदेशकांना शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक डीपीसी-२०१४ / प्र.क्र. ०७ / पोल-१०, दिनांक २१.०८.२०१८ नुसार दरमहा रुपये २०,०००/- + रुपये ३,०००/- मानधन + दूरध्वनी व प्रवासखर्च अनुज्ञेय राहील.

४) करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या विधी निदेशकांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

**कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

१. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे.

२. पोलीस प्रशिक्षण केंद्रात वेळोवेळी होणाऱ्या स्पर्धा परीक्षा तथा लेखी परीक्षा यासाठी प्रश्नपत्रिका संच तयार करणे, परीक्षा घेणे, उत्तर पत्रिका तपासणे, परीक्षेचा निकाल तयार करणे इ. परीक्षाविषयक बाबींमध्ये अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र यांना मदत करणे.

३. पोलीस प्रशिक्षण विषयक सर्व बाबी तथा वेळोवेळी नेमून दिलेली कामे.

प्रविण पडवळ
०६.०६.'२४

**(प्रविणकुमार पडवळ)**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ / जालना / अकोला / नागपुर / धुळे / तुरची-सांगली / सोलापुर

२/- प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त नमूद उमेदवार विधी निदेशक पदावर हजर झाल्याचा दिनांक कृपया या कार्यालयास कळवावा. तसेच, संबंधीत विधी निदेशकाकडून शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एसपीपी-२००५/ प्र.क्र. २४७ / पोल-१०, दि.१५.०९.२००६ सोबतच्या परिशिष्ट-ब नुसार करारनामा प्राप्त करुन घेऊन सदरहू करारनामा या कार्यालयास पाठविण्यात यावा.

प्रत,

सर्व संबंधित उमेदवार.

प्रत सविनय सादर :

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(लक्षवेध : कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २-अ)